उद्यान कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- उकाजा/ १७८८
दिनांक :- १०/८/२६

दरपत्रक चौकशी

प्रति,

-----------------------

-----------------------

विषय -: राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील तृणभक्षक प्राण्यांच्या खाद्यासाठी लसूनघास पुरवठा करणे या कामाकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.

महोदय,

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी प्राणीसंग्रहालयातील तृणभक्षक प्राण्यांच्या खाद्यासाठी लसूनघास पुरवठा करणे या कामाकरिता खाली दिलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मालाचे नाव | दैनंदिन मागणी (किलोमध्ये) | एकूण वार्षिक मागणी |
|---|---|---|---|
| १. | लसूनघास | ७०० | २,५५,५०० किलो |

१) वरील यादीतील मालाचे दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे सर्व करांसहीत असणे आवश्यक आहे.

२) प्राणीसंग्रहालयातील तृणभक्षक प्राण्यांच्या खाद्यासाठी लसून घास पुरवठा करणे या कामाकरिता अंदाजित रक्कम काढण्याकरिता दरपत्रक मोहर बंद पाकिटात सादर करणे आवश्यक आहे. सदर पाकिटावर जावक क्र. नमूद करावा. ई-मेलद्वारे सादर केलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.

३) सदर मालाचा पुरवठा सकाळी ०९:३० वाजता राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे करावा लागेल.

४) पुरवठा करताना माल निकृष्ठ असल्यास ठेकेदारास तो त्याच दिवशी बदलून द्यावा लागेल.

५) दरपत्रक मधील परिमाण अंदाजे असून जेवढा माल लागेल तेवढाच घेतला जाईल.

६) सदरचे दरपत्रक मा.सह महापालिका आयुक्त, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांच्या नावाने मोहर बंद पाकिटात उद्यान कार्यालय, छत्रपती संभाजीराजे उद्यान, जंगली महाराज रस्ता, शिवाजीनगर, पुणे-०५ येथे सादर करावेत.

७) दरपत्रक सादर करण्याची शेवटची तारीख ३/ ८ /२०२६ व वेळ २:३० वाजेपर्यंत आहे. नियोजित तारखेनंतर आणि वेळेनंतर प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.

८) दरपत्रकात सादर केलेले दर निविदा संपुष्टात येईपर्यंत एकसारखे राहतील.

९) प्रस्तुत कामासाठी खालीलपैकी एक अनुभवाची अट आवश्यक आहे.

अ) शासकीय/निमशासकीय विषयांकित कामाचा अनुभवाचा दाखला.

आ) केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधीकरण मान्यताप्राप्त प्राणीसंग्रहालये,शासकीय/निमशासकीय/महामंडळाच्या वतीने संचालीत प्राण्यांचे प्रक्षेत्र यांना समाधानकारक माल पुरवठा करण्याचा अनुभव.

अथवा

इ) भारतातील घोडे रेस कोर्स/घोडे फार्म यांना माल पुरवठा करण्याचा अनुभव.

Scanned with OKEN Scanner

ई) निविदादार राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे मालाचा पुरवठा करत असल्यास / केला असल्यास त्याच्या पुरवठा कालावधीतील त्याने सर्वात शेवटी समाधानकारक माल पुरवठा केलेबाबतचा अनुभवाचा दाखला.

१०) कोणतेही कारण न देता, कोणतेही किंवा सर्व दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे राखीव आहे.

११) सदर दरपत्रकात सादर केले जाणारे दर बाजारभावाशी सुसंगत असले पाहिजे अन्यथा वाढीव दर ग्राह्य धरले जाणार नाहीत.

संतोष टिळेकर
वरिष्ठ लिपिक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

मनोज जाधव
लाईव्हस्टॉक सुपरवायझर
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.सुचित्रा सूर्यवंशीपाटील
उप संचालक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.राजकुमार जाधव
संचालक
राजीव गांधी प्राणीसंग्रहालय
पुणे महानगरपालिका

डॉ.अशोक दि.घोरपडे
सह महापालिका आयुक्त
उद्यान विभाग
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner